**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**व्यवस्थापन परिषद कार्यवृत्तांत**

**मंगळवार, दि. ३० मार्च, २०१० दुपारी ०१:०० वा.**

**व्यवस्थापन परिषदेची सभा मंगळवार दि.३०/०३/२०१० रोजी दुपारी ०१:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बा. पां. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. अ.ना. बारबोले | सदस्य |
| ३) | ॲड. रा.पा.सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. ला. प. देशमुख | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. रा. ना. शेंडगे | सदस्य |
| ६) | प्राचार्य ज. कों. बिले | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. चं. बि. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. प्र. गो. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. नि. बा. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती नं. वि. साठे | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. ह. ना. जगताप | सदस्य |
| १२) | श्री. ब. पां. रोंगे | सदस्य |
| १३) | श्री. ना. रा. गरड | सदस्य |
| १४) | डॉ. डी. जे. साळुंखे -परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १५) | डॉ. डी. डी. पुजारी -वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १६) | कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे, कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

डॉ. बाबासाहेब कदम, श्री. पं. म. हिरेमठ यांनी दुरध्वनीद्वारे व श्री. ज. शं. मोहिते-पाटील, श्रीमती मि. सु. कदम यांनी पत्राद्वारे या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे, याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**विषय क्र.१ दि.१० मार्च, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| **ठराव क्र.१** | **दि.१० मार्च, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यालयीन कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** | | |
| | **१)** | **पूर्वीचा ठराव क्र. ६:** | **विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीस कोणताही धोका पोहोचणार नाही व पाईपलाईनसाठी खोदलेली जमीन सपाटीकरण करुन देणे या अटीस अधीन राहून जिल्हा परिषद सोलापूर यांना अभ्यासकेंद्र रंगभवन सोलापूर येथील संरक्षक भिंतीलगत आतील बाजूस पाईपलाईन टाकण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे** |
| | **: दुरुस्ती :** | | |
| | **१)** | **दुरुस्त ठराव क्र. ६:** | **विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीस कोणताही धोका पोहोचणार नाही व पाईपलाईनसाठी खोदलेली जमीन सपाटीकरण करुन देणे तसेच संरक्षक भिंतीस धोका पोहोचल्यास त्याची दुरुस्ती करुन देणे या अटीस अधीन राहून जिल्हा परिषद सोलापूर यांना अभ्यासकेंद्र रंगभवन सोलापूर येथील संरक्षक भिंतीलगत आतील बाजूस पाईपलाईन टाकण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.** |
| | **२)** | **पूर्वीचा ठराव क्र.११:** | **बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात दरवर्षी सप्टेंबर महिन्यात व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठीचा निधी फक्त विद्यापीठाच्या नावे ठेवण्याच्या अटीस अधीन राहून प्रस्ताव स्वीकारण्यात आला.** |
| | **: दुरुस्ती :** | | |
| | **२)** | **दुरुस्त ठराव क्र.११:** | **बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात दरवर्षी सप्टेंबर महिन्यात व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठीच्या प्रस्तावाचा निधी फक्त विद्यापीठाच्या नावे ठेवण्याच्या अटीस अधीन राहून प्रस्ताव स्वीकारण्यात आला.** |
| | **३)** | **पूर्वीचा ठराव क्र. १८(५)** | **विद्यापीठाकडील एम.सी.ए. भाग ३ सेमिस्टर ३ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी शुल्क कमी करण्याबाबत मा. प्र. संचालकांची शिफारस स्वीकारण्यात येवून शुल्क रु.१,०५०/- आकारण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | **: दुरुस्ती :** | | |
| | **३)** | **दुरुस्त ठराव क्र. १८(५)** | **विद्यापीठाकडील एम.सी.ए. भाग ३ सेमिस्टर ३ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क कमी करण्याबाबत मा. प्र. संचालकांची शिफारस स्वीकारण्यात येवून शुल्क रु.१,०५०/- आकारण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | **उर्वरित ठराव पुढील पानावर..** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ठराव क्र. १ मागील पानावरुन पुढे चालू.. | | |
| | ४) | पूर्वीचा ठराव क्र. १८(७) | विद्यापीठ परिसरातील अंतर्गत रस्त्याच्या खडीकरणाच्या निविदेतील परिमाणापेक्षा जास्तीच्या व बचत झालेल्या परिमाणास व यापोटी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. |
| | : दुरुस्ती : | | |
| | ४) | दुरुस्त ठराव क्र. १८(७) | विद्यापीठ परिसरातील अंतर्गत रस्त्याच्या खडीकरणाच्या निविदेतील परिमाणापेक्षा जास्तीच्या रु.२,८७,७१०/- होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. |
| | ५) | पूर्वीचा ठराव क्र. १८(८) | विद्यापीठ परिसरातील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणाच्या निविदेतील परिमाणापेक्षा जास्तीच्या व बचत झालेल्या परिमाणास व यापोटी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. |
| | : दुरुस्ती : | | |
| | ५) | दुरुस्त ठराव क्र. १८(८) | विद्यापीठ परिसरातील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणाच्या निविदेतील परिमाणापेक्षा जास्तीच्या रु.२,८७,९७९/- होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. |
| | ६) | पूर्वीचा विषय क्र. १८(११) | व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. ए. एन. बारबोले यांचे दि.०९/०३/२०१० रोजीच्या पत्रातील विषय क्र. ५ - मागील सभेमध्ये प्राचार्य चिट्टेंच्या गैरवर्तनाबाबत मी कांही तांत्रिक मुद्दे उपस्थित करुन पत्र दिले होते. त्यावेळेस आपण मुद्दे महत्वाचे आहेत. त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. त्याचे काय झाले ? |
| | : दुरुस्ती : | | |
| | ५) | दुरुस्त विषय क्र. १८(११) | व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. ए. एन. बारबोले यांचे दि.०९/०३/२०१० रोजीच्या पत्राबाबत. |

**विषय क्र.२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र. ०३ मा. ढेकणे एम. आर. (रा. औरंगाबाद) यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह सोलापूर विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारणेबाबत.**

(टिपणी :- मा. ढेकणे एम. आर. यांच्या सोबतच्या पत्रान्वये त्यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगी म्हणून देण्याची त्यांची इच्छा आहे. ग्रंथालयास देणगी दाखल मिळणाऱ्या ग्रंथाची उपयुक्तता तसेच त्यांची वापराबाबतची स्थिती इ. बाबत ग्रंथालय उपसमितीने पाहणी करुन ग्रंथ स्विकारण्याबाबत शिफारस करावयाची असते. परंतु सदरचे ग्रंथ हे (Archeology) प्राचीन पुरातत्वशास्त्र या एकाच विषयांचे असल्याने अधिविभागाकडील प्राचीन पुरातत्वशास्त्र या विषयाच्या प्र. विभागप्रमुख मा. डॉ. माया जे. पाटील यांचे "विषय तज्ञ" म्हणून मत घेण्यात आले असनू त्यांनी सदरचे ग्रंथ स्विकारावेत असा शेरा दिला ओ तो यासोबत जोडला आहे. तरी सदरचा ग्रंथसंग्रह विद्यापीठाकडील "प्राचीन पुरातत्वशास्त्र" या अधिविभागास उपयुक्त होईल. तो विद्यापीठाने स्विकारावा अशी त्यांची इच्छा आहे.

सदरचा ग्रंथसंग्रह स्विकारणेबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (एच) प्रमाणे स्विकारण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०३** | **मा. ढेकणे एम. आर. (रा. औरंगाबाद) यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. ०४ शैक्षणिक वर्ष २०१० - ११ साठी सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ .**

(टिपणी :- सोबत सोलापूर विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग यांचे शैक्षणिक वर्ष २०१० - ११ साठी सत्रारंभ व सत्र समाप्तीचे वेळापत्रक जोडले आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (r) प्रमाणे सदरच्या तारखा विद्यापरिषदेमार्फत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याची कायद्यात तरतूद आहे. नजीकच्या काळात विद्यापरिषदेची सभा आयोजित होणार नसल्यामुळे शै.वर्ष २०१०-११ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा संलग्नित सर्व महाविद्यालयांना वेळेत कळविण्यासाठी सदर तारखांना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु यांच्या अधिकारात विद्या परिषदेच्यावतीने मान्यता घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१०-११ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०४** | **शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी सत्रारंभ व सत्रसमाप्ती सोबतच्या तक्त्यातील तारखांना मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. ०५ सन २००९-१० च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१०-११ च्या मूळ अंदाजपत्रकास मंजूरीची बाब मान्यतेसाठी सादर.**

**(सोबत अंदाजपत्रक जोडले आहे)**

टिपणीः- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (ई) व (१०१) नुसार वित्त व लेखा अधिकारी यांनी तयार केलेले विद्यापीठाचे सन २००९-१० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१०-११ चे मूळ अंदाजपत्रक दि.२२/०३/२०१० च्या वित्त व लेखा समितीसमोर सादर करण्यात आले. त्यास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली.

सबब वित्त व लेखा समितीने सुचविलेल्या दुरुस्तीसह अंदाजपत्रक व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| ठराव क्र.०५ | **सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१०-११ चे मूळ अंदाजपत्रक याबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस दुरूस्तीसह स्वीकारण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०६** | **द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of M.Phil. / Ph.D., Regulation, 2009 नुसार एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीचा तयार केलेला दंडक व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.** |

**(सोबत नियोजित दंडकाची प्रत)**

(टिपणीः द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of M.Phil. / Ph.D., Regulation, 2009 नुसार एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठीची सुधारित नियमावली तयार करण्यासाठी दिनांक २१ नोव्हेंबर २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये खालीलप्रमाणे ठराव झाला.

(ठराव क्र.१७ द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of Ph.D., Regulation, 2009 नुसार एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीचा तयार केलेल्या दंडकाची शिफारस मा.कुलगुरुमहोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही स्वीकारण्यात येऊन दुरुस्तीसह दंडकासंदर्भात विहीत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली).

दंडकात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यास खालील समिती गठीत करण्यात आली.

१) प्रा. रोंगे बी. पी.

२) प्रा. साठे एन. व्ही.

उपनिर्दिष्ट समितीने दंडकात आवश्यक त्या दुरुस्त्या करुन पत्र प्राप्त होताच अत्यंत तातडीने दंडक कार्यालयास सादर कराव्यात).

समितीने पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या नियमावलीमध्ये दुरुस्ती केलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ (i) व ५४(१) अन्वये सदरचा दंडक तयार करुन त्यास मा.कुलपती तथा राज्यपाल यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदरच्या एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीचा दुरुस्त केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी व त्याचे दंडकात रुपांतर करणेबाबत विचारार्थ.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०६** | **द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of M.Phil. / Ph.D., Regulation, 2009 नुसार एम.फिल. व पीएच.डी. पदवीसाठीच्या तयार केलेल्या नियमावलीचे दंडकात रुपांतर न करता खालीलप्रमाणे दुरुस्त्या करुन नियमावलीत रुपांतर करण्यास मान्यता देण्यात आली.**<br>**a) R.Ph.D.3(v) The candidates who have completed M.Phil. Course work from Solapur University, Solapur shall be exempted from the Ph.D. Course work.**<br>**b) R.Ph.D. (i) Deleted**<br>**c) R.Ph.D.4(ii) There shall be a committee for interview and allotment of students to the Guides consisting of,**<br>• **Dean of the concerned faculty - Chairman**<br>• **Chairman of Board of Studies in the concerned subject - Member**<br>• **Director/Professor of the concerned school - Member**<br>• **Two subject experts from same or related subject - Member**<br>• **One subject expert from each research centre - Member**<br>**उर्वरित ठराव पुढील पानावर...** |

मागील पानावरुन ठराव चालू...

| | | |
|---|---|---|
| d) | R.Ph.D. 4(iv) | deleted |
| e) | R.Ph.D.15(v) | Following reservation of seats shall be applicable for every subject in addition to R.Ph.D.15(iv). |
| | a) | 10% seats shall be reserved for those approved teachers working in the affiliated colleges/ institutions of Solapur University, Solapur. |
| | b) | 70% seats shall be reserved for those who have completed their post graduation from Solapur University Solapur or residing in the district of Solapur. |
| | c) | 20% seats shall be reserved for other University candidates, those who are not following under (a) or (b) above. |
| | d) | If any vacancy exists in above 'a' or 'b' or 'c', the University shall have the rights to fill up such vacancy from any other category of above. |
| f) | R.Ph.D. 20(i) (a) | The candidate shall make a presentation of his / her thesis before the committee mentioned in R.Ph.D. 4(ii) (the guide of the concern student shall also be a member of this committee only for scrutiny purpose) atleast two months prior to the submission of the thesis. The research student shall incorporate suggestions made by the committee and only then the thesis shall be submitted. |
| g) | R.Ph.D. 20 (i) (b) | For the purpose of scruity, three copies of the thesis shall be submitted in the form of spiral binding with a computer readable form (soft copy). |
| h) | R.Ph.D. 20 (i) (c) | A candidate may submit his / her thesis any time during the year, after the completion of minimum prescribed period of two years and completion of M.Phil./ Pre-Ph.D. theory course / Ph.D. course work successfully. |
| i) | R.M.Phil. 9 | Normally not more than five M.Phil. students shall be assigned to a guide. The number of students to be admitted to the M.Phil. course will depend upon the availability of the eligible teachers. |

**विषय क्र.०७ मुलांच्या वसतिगृह इमातीच्या बांधकामास मुदतवाढ मिळण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे रुपये १,१९,१२,०००/-रक्कमेचे काम वाटाघाटीनंतर १३.३०% जादा दराने म्हणजेच रुपये १,३४,९६,२९६/- इतक्या रक्कमेचे श्री.एन.एम.मंठाळकर सोलापूर यांना देण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| मूळ आदेश दिनांक | : | एसओएल/युटीवाय/६४७४ दि.८/११/२००६ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | १२ महिने |
| उर्वरित काम पूर्ण करण्याचा आदेश | : | एसओएल/युटीवाय/५६ दि. ४/४/२००९ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | दि ३० सप्टेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढ | : | दि.३० नोव्हेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढीसाठी आलेला विनंती अर्ज | : | दि. ५ नोव्हेबर २००९ |
| पुढील मुदतवाढ नाकारल्याचा दिनांक | : | दि. २३ नोव्हेंबर,२००९ |

सबब श्री. एन.एम.मंठाळकर यांचे दि. ५ नोव्हेंबर २००९ च्या पत्रानुसार मुदतवाढ देणेबाबबत व मुदतवाढीनंतर Price Varition Clause देणेबाबत तांत्रिक समितीच्या दि.२०/३/२०१० च्या बैठकीसमोर वरिल विषय क्र.२ नुसार ठेवला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला .

| | |
|---|---|
| ठराव क्र.२: | विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्रव्यवहार पाहता कंत्राटदारास दिनांक १.१२.०९ते दि-३०.०४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे. तथापी दि-३०.०४.२०१० पर्यंत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रती दिन रुपये-१०००/- प्रमाणे दंड आकारणीची शिफारस करण्यात येत आहे. |

सदरची बाब दि.२२/३/२०१० च्या बांधकाम समितीसमोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| बांधकाम समिती ठराव क्र. २ (२): | तांत्रिक समितीची शिफारस विचारात घेता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला. विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्र व्यवहार पाहता कंत्राटदारास दि.१.१२.२००९ ते दि.३०.४.२०१० पर्यत भाववाढ गोठवून अंतिम मुदत वाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे. तथापि दि. ३०.४.२०१० पर्यत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रति दिन रुपये- २५,०००/-प्रमाणे दंड आकारण्याची शिफारस करण्यात आली. |

सबब बांधकाम समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०७** | **मुलांच्या वसतिगृह इमारतीच्या बांधकामास दि.३०/०४/२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देण्याची तसेच दि.३०/०४/२०१० पर्यंत बांधकाम पूर्ण न झाल्यास प्रति दिन रु.२५,०००/- प्रमाणे दंड आकारणी करण्याची बांधकाम समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.०८ कला व भाषा इमातीच्या बांधकामास मुदतवाढ मिळण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - सोलापूर विद्यापीठ परिसरातील कला व भाषा इमारतीचे बांधकाम करणे रुपये १,४१,२१,०००/-रक्कमेचे काम वाटाघाटीनंतर १२.४०% जास्ती दराने म्हणजेच रुपये १,५८,७२,००४/- इतक्या रक्कमेचे श्री.एन.एम.मंठाळकर सोलापूर यांना देण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| मूळ आदेश दिनांक | : | एसओएल/युटीवाय/६४७५ दि.८/११/२००६ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | १२ महिने |
| उर्वरित काम पूर्ण करण्याचा आदेश | : | एसओएल/युटीवाय/५६ दि. ४/४/२००९ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | दि ३० सप्टेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढ | : | दि.३० नोव्हेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढीसाठी आलेला विनंती अर्ज | : | दि. ५ नोव्हेबर २००९ |
| पुढील मुदतवाढ नाकारल्याचा दिनांक | : | दि. २३ नोव्हेंबर,२००९. |

सबब श्री. एन.एम.मंठाळकर यांचे दि. ५ नोव्हेंबर २००९ च्या पत्रानुसार मुदतवाढ देणेबाबबत व मुदतवाढीनंतर Price Varition Clause देणेबाबत तांत्रिक समितीच्या दि.२०/३/२०१० च्या बैठकीसमोर वरिल विषय क्र.२ नुसार ठेवला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला

| | |
|---|---|
| ठराव क्र.३: | विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्रव्यवहार पाहता कंत्राटदारास दि-१.१२.२००९ ते दि-३०.०४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे. तथापी ३०.०४.२०१० पर्यंत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रती दिन रुपये-२५,०००/- प्रमाणे दंड आकारणीची शिफारस करण्यात येत आहे. |

सदरची बाब दि.२२/३/२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| बांधकाम समिती ठराव क्र. २ (२): | **तांत्रिक समितीची शिफारस विचारात घेता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला. विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्र व्यवहार पाहता कंत्राटदारास दि.१.१२.२००९ ते दि.३०.४.२०१० पर्यत भाववाढ गोठवून अंतिम मुदत वाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे. तथापि दि.३०.४.२०१० पर्यत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रति दिन रुपये-२५,०००/-प्रमाणे दंड आकारण्याची शिफारस करण्यात आली.** |

सबब बांधकाम समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०८** | **कला व भाषा इमारतीच्या बांधकामास दि.३०/०४/२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देण्याची तसेच दि.३०/०४/२०१० पर्यंत बांधकाम पूर्ण न झाल्यास प्रति दिन रु.२५,०००/- प्रमाणे दंड आकारणी करण्याची बांधकाम समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. ०९ अतिथीगृह इमारतीचे बांधकामातील काही आयटमचे प्रमाण जास्त आणि काही आयटमचे प्रमाणात सेव्हिंग होणार आहे सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी-सोलापूर विद्यापीठ परिसरात व्ही.आय.पी.अतिथीगृह बांधकाम करणे एकुण रुपये ९५,०८,१८१/-रक्कमेचे काम वाटाघाटीनंतर १.५० % जास्त दराने म्हणजेच रुपये ९६,५०,८०४/- इतक्या रक्कमेचे श्री.अतुल सी.गायकवाड सोलापूर यांना देण्यात आले आहे.

सदर कामाचे Excess/Saving/Extra item याचा सविस्तर तक्ता जोडला आहे.

**Part - A (living Room)**

| | | |
|---|---|---|
| 1 | Total Excess | Rs. 10,89,723/- |
| 2 | Total Saving | Rs. 13,54,683/- |
| 3 | Extra Item | Rs. - Nil - |
| 4 | Net saving [1+2-3] | Rs. 2,64,960/- |

**Part - B (Kitchen/Dinning Room**

| | | |
|---|---|---|
| 1 | Total Excess | Rs. 1,22,383/- |
| 2 | Total Saving | Rs. 2,92,761/- |
| 3 | Extra Item | Rs. - Nil - |
| 4 | Net Saving | Rs. 1,70,378/- |

Net Saving= Rs. 4,35,338/- saving [2,64,960+1,70,378]
Tendered rate @ 1.5 % above hence
Net Saving= Rs.4,41,868/-

सदर कामामध्ये रु. ४,४१,८६८/- इतकी बचत झालेली आहे. सोबत तक्ता जोडून तांत्रिक समितीच्या दि.२०/३/२०१० च्या बैठकीसमोर वरील विषय क्र.४ नुसार ठेवला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| **ठराव क्र- ४** | **नोंद घेण्यात आली. वास्तुविशारदांचे समर्थन सोबत जोडले आहे.** |

सदरची बाब दि. २२.३.२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| **बांधकाम समिती ठराव क्र.२ [४]** | **सदरचा प्रस्ताव मान्य करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

सबब बांधकाम समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०९** | **अतिथीगृह इमारतीच्या बांधकामातील सोबतच्या तक्त्याप्रमाणे आयटमच्या जास्तीच्या प्रमाणाबाबतची बांधकाम समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १०	अतिथीगृह इमारतीमागील परिसरात रिचार्ज वेल बांधण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - सोलापूर विद्यापीठ परिसरात अतिथीगृह इमारत बांधण्यात आली असून इमारतीमागील भाग खोलगट असल्याने त्या जागेत विद्यापीठाच्या संपुर्ण पसिरातील पावसाचे पाणी गोळा होते. यासाठी यापूर्वी सदर भागात मुरुम टाकून भर घालणे व संरक्षण भिंत बांधणे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र-२, सोलापूर कडून रुपये-१७,१४,६१८/- ची तांत्रिक मंजूरी घेण्यात आली आहे. परंतु सदर काम केल्यानंतरही पावसाच्या पाण्याचा त्रास होणार असलेने सदर पाण्याचा विनियोग करणेसाठी पाणी पुर्नभरण करणे विचाराधीन आहे. त्या अनुशंगाने सदर जागेवर रिचार्ज वेल करणे सोईचे आहे व त्यासाठी सदर जागा उत्तम आहे.

तेव्हा मुरुम भरणे व संरक्षक भिंत बांधणेचे रुपये १७,१४,६१८/- चे इतके कामाऐवजी रिचार्ज वेलचे काम करणेबाबत तांत्रिक समितीच्या दि.२०/३/२०१० च्या बैठकीसमोर वरील विषय क्र.७ नुसार ठेवला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.७** | **रिचार्ज वेल बांधण्याकरिता तज्ञांचा सल्ला घेवून काम करुन घेण्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

सदरची बाब दि. २२.३.२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| **बांधकाम समिती ठराव क्र.२ [७]** | **तांत्रिक समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून व्यवस्थापन परिषदेला मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.** |

सबब बांधकाम समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१०** | **अतिथीगृह इमारतीच्या परिसरात रिचार्ज वेल बांधण्याबाबतची बांधकाम समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.११** | **सोलापूर विद्यापीठ परिसरातील अंडरग्राउंड केबलींग कामातील काही आयटमचे प्रमाण जास्त आणि काही आयटमचे प्रमाणात सेव्हिंग होणार आहे सबब विचारार्थ सादर.** |

([टिपणी - सोलापूर विद्यापीठ परिसरातील जमिनीखालून केबलींग करणे एकुण रुपये १९,०६,८००/-रक्कमेचे काम वाटाघाटीनंतर २ % कमी दराने म्हणजेच रुपये १८,६८,६६४/- इतक्या रक्कमेचे श्री.अवधुत इलेक्ट्रीकल्स पुणे यांना सोविसो/कामाचे आदेश/०९/१०/५१८७ दि.२७/११/२००९ नुसार देण्यात आले आहे.

इलेक्ट्रीकल पॅनेल रुममधील जुना ऑईल सर्किट ब्रेकर खराब झाला असल्याने नविन एअर सर्किट ब्रेकर ६३० ॲम्पीअर व पॅनेल बोर्ड बनविणे जरुरीचे असल्याने सदर कामाचा विचार करता दि.२७/११/२००९ रोजी दिलेल्या कामाच्या आदेशापेक्षा जास्तीची व बचत
झालेली Quantity यांचा सविस्तर तक्ता सोबत जोडलेला आहे.

त्यानुसार सदरच्या कामामध्ये रुपये २,८०,६३०/- बचत होवून रुपये २,७३,७४४/- ची वाढ होत आहे. त्यामुळे त्याची निव्वळ बचत रुपये ६८८६/- [२,८०,६३० - २,७३,७४४] होत आहे.

सदरचा विषय तांत्रिकी समितीच्या दि.२०.३.२०१० च्या बैठकीसमोर वरील विषय क्र.९ नुसार ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.९** | **उप अभियंता, सा.बा.उपविभाग [विद्युत], सोलापूर यांचेकडून काम प्रमाणित करुन घेणेची शिफारस करणेत आली.** |

सदरची बाब दि. २२.३.२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| **बांधकाम समिती ठराव क्र.२ [९]** | **तांत्रिक समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून व्यवस्थापन परिषदेला मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.** |

सबब बांधकाम समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.११** | **विद्यापीठ परिसरातील अंडरग्राउंड केबलींग कामातील काही आयटमच्या कमी व जास्तीच्या प्रमाणास बांधकाम समितीने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १२ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ९५ नुसार विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शिस्त पालन नियमावली विचारार्थ.**

([टिपणी - महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ९५ अन्वये विद्यापीठ संकुल व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या परिसंस्था व महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांना संबंधित शिस्तीसाठीची नियमावली तयार करण्यासाठी मा.कुलगुरुमहोदयांनी खालील समिती नियुक्त केली होती.

१) मा. प्राचार्य एस. एन. गोसावी

२) मा. डॉ. तानाजी कोळेकर

३) मा. डॉ. ए. ए. घनवट

सदर समितीने दि.१८/०३/२०१० रोजीच्या बैठकीत नियमावली तयार करुन विद्यापीठ प्रशासनास सादर केलेली आहे. सबब सदरची नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१२** | **विद्यापीठ संकूल व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेतील विद्यार्थ्यांकरीता शिस्त पालन नियमावलीस दुरूस्तीसह मान्यता देण्यात आली.** |

**<u>मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः</u>**

**विषय क्र. १३(१) पदार्थविज्ञान संकुलाकरिता आवश्यक असणाऱ्या Journal of Materials Science: Materials in Electronics या एका नियतकालिकाची खरेदी करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत तुलनात्मक तक्ता जोडला आहे)**

(टिपणी: मा. संचालक पदार्थविज्ञान संकुल यांच्या दि.२०/०१/२०१० च्या अं. का. टिपणीस अनुसरुन संबंधित विभागाकरिता २००९-१० या वर्षासाठी "Journal of Materials Science: Materials in Electronics" हे परदेशी नियतकालिक खरेदी करण्याची <u>मागणी / शिफारशीस</u> अनुसरुन सदरचे नियतकालिक खरेदी करण्यासाठी खालील एजन्सीकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या.

१) मे. इंडिया बुक हाऊस सबस्क्रिप्शन एजन्सी, मुंबई.
२) मे. व्हिनो इंटरनॅशनल सबस्क्रिप्शन एजन्सी, मुंबई.
३) मे. सिता बुक्स अँड पिरॉडिकल्स प्रा. लि. मुंबई
४) मे. क्रिएटिव्ह बुक्स अँड पिरॉडिकल्स प्रा. लि. मुंबई

या चार पुरवठा एजन्सी कडून बंद दरपत्रके मागवण्यात आली होती. त्या उघडून त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे तो सोबत जोडला आहे. उपरोक्त चार एजन्सीज्पैकी मे. व्हिनो इंटरनॅशनल सबस्क्रिप्शन एजन्सी, मुंबई यांचेकडे सदरच्या नियतकालिकांची वार्षिक वर्गणीची रक्कम / दर उपलब्ध होऊ शकले नाहीत.

सोबतच्या तुलनात्मक तक्त्यामध्ये संबंधित नियतकालिकांची किंमत / दर मे. क्रिएटिव्ह बुक्स अँड पिरॉडिकल्स प्रा. लि. मुंबई यांचे दर सर्वात कमी **(Rs.१,०६,५८१/-)** आहे.

सदरच्या नियतकालिकांची किंमत रुपये एक लाखापेक्षा जास्त म्हणजेच रु.१,०६,५८१/- असल्यामुळे सदरच्या प्रस्तावास खरेदी समिती व वित्त व लेखा समितीच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे. सबब मे क्रिएटिव्ह बुक्स अँड पिरॉडिकल्स प्रा. लि. मुंबई यांचेकडून रु.१,०६,५८१/- या दराने "Journal of Materials Science: Materials in Electronics" हे नियतकालिक खरेदी करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१३ (१)** | **पदार्थविज्ञान संकुलाकरिता आवश्यक असणाऱ्या Journal of Materials Science: Materials in Electronics हे नियतकालिक खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१३(२) विद्यापीठातंर्गत परीक्षांच्या उत्तरपत्रिका व इतर साहित्य जे नियमाप्रमाणे संरक्षित करणे आवश्यक नाही रद्दी विक्रीची बाब विचारार्थ सादर.**

(टिपणी: विद्यापीठाअंतर्गत परीक्षांच्या उत्तरपत्रिका व इतर साहित्य जे नियमाप्रमाणे संरक्षित करणे आवश्यक नाही अशी रद्दी विक्रीसाठी दै. पुढारी व दै. संचार या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण ०४ फर्मने निविदा सादर केल्या. सदरच्या निविदा दि.२५/३/२०१० रोजी उघडण्यात आल्या. त्यानंतर सदर फर्मला वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले. वाटाघाटीसाठी नंतरचा तौलनिक तक्ता सोबत जोडला असून त्यानुसार फयान ट्रेडिंग कंपनी यांचे दर सर्वात जास्त आहे. सदरची बाब मा.कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये खरेदी समिती व वित्त व लेखा समितीच्या वतीने स्वीकारली आहे. तेव्हा उत्तरपत्रिकांची व इतर साहित्य जे नियमाप्रमाणे संरक्षित करणे आवश्यक नाही ते मे. फयान ट्रेडिंग कंपनी यांना सोबत जोडलेल्या तक्त्यातील दराप्रमाणे विक्री करणेसाठी विचारार्थ.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१३ (२)** | **विद्यापीठातंर्गत परीक्षांच्या उत्तरपत्रिका व इतर साहित्य जे नियमाप्रमाणे संरक्षित करणे आवश्यक नाही अशी रद्दी विक्री करण्याबाबत तुलनात्मक तक्त्यातील सर्वात जास्त दर असणारे मे. फयान ट्रेडिंग कंपनी यांना रद्दी विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१३(३) विद्यापीठात कार्यरत असलेल्या अठरा शासकीय कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनमान्य मंजूर पदावर कायम सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचा अभिप्राय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत शासनाचा अभिप्राय जोडला आहे)**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा. डॉ. अ. ना. बारबोले यांनी दिलेल्या पत्राबाबत दि.१० मार्च, २०१० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. १८(१२) अन्वये सादर केला असता यावरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८ (१२)** | **विद्यापीठात कार्यरत असलेल्या अठरा शासकीय कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनमान्य मंजूर पदावर कायम सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचा अभिप्राय घ्यावा. प्राप्त अभिप्राय आगामी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवावा असे ठरले.** |

या अनुषंगाने, कार्यालयीन पत्र जा.क्र. सोविसो/आस्था/२००९-१०/१०५१८, दि.१०/०३/२०१० अन्वये, मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे व मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर यांच्याकडून दि.१०/०३/२०१० रोजीच्या प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत झ ालेल्या ठरावाच्या अनुषंगाने आपणांस विनंती करण्यात येते की, कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.१९/०९/२००९ च्या शासन निर्णयान्वये शासनमान्य पदावर कायम सेवेत सामावून घेणेबाबत मान्यता द्यावी असे कळविण्यात आले होते. या अनुषंगाने, मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे व मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त झालेला अभिप्राय -

१) संचालक (उ.शि.) पुणे : दि.१९/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार आपल्या विद्यापीठास एकूण २१० शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांना कोणतेही कायमपणाचे फायदे देता येत नाहीत.

२) सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर : कंत्राटी पदे भरताना सर्वांना नैसर्गिक न्यायाप्रमाणे संधी दिली गेली नसल्याने काही ठरावीकच उमेदवारांनी या पदाकरिता अर्ज केले असल्याचे दिसून येते. त्यामूळेच निवड प्रक्रियेत सर्वांना नैसर्गिक न्याय दिला गेला नाही ही वस्तुस्थिती विचारात घेवून कंत्राटी पदांवरील उमेदवारांना नियमित करता येणार नाही. सदरची कंत्राटी पदे भरताना जाहिरात कंत्राटी पदांसाठीच व केवळ ११ महिन्याकरिताच असल्याने तसेच नियुक्तीमध्ये नियमित करणेबाबतची कोणतीही तरतूद नसलेने त्यांना सेवेत नियमित करणे अयोग्य आहे.

शासनाच्या प्रचलित नियमानुसार तात्पुरत्या / कंत्राटी पदांवरील कर्मचाऱ्यांना नियिमत करता येत नाही ही बाब विचारात घेवून महाराष्ट्र विद्यापीठीय कायदा १९९४ मधील कलम ८ नुसार शासनावर जादा आर्थिक भार पडेल असा कोणताही ठराव विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेला करता येणार नाही.

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१३ (३)** | **विद्यापीठात कार्यरत असलेल्या अठरा शासकीय कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनमान्य मंजूर पदावर कायम सेवेत सामावून घेण्याबाबत मा. शिक्षण संचालक(उ.शि.), पुणे यांच्या पत्र क्र. युएनआय/२११४/कंत्राटी क/विशि-१, दि.२६/०३/२०१० व मा.शिक्षण सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर यांचे पत्र क्र. विशिसस/उशि/कोवि/१/१३६३-६४, दि.२८ मार्च, २०१० या पत्रांची नोंद घेण्यात आली.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**